जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख (म.राज्य)पुणे यांचे कार्यालय नविन प्रशासकीय इमारत दुसरा मजला, विधानभवन समोर, पुणे दुरध्वनी क्रमांक :- ०२०/२६०५०००६, फॅक्स नंबर :- २६०५०७५३

---

माहितीचा अधिकार

क्र.आस्था ३/कें.मा.अ.अ.०५/प्र.क्र.१९० /२०१४
पुणे दिनांक : ११ /८/२०१४

11 AUG 2014

प्रति,
कार्यासन अधिकारी -ई-६
महसुल व वन विभाग, मंत्रालय ,
मुंबई -३२

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम २००५
प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून सक्षम अधिकाऱ्यांना पदनिर्देशित करणेबाबत .

संदर्भ :-१)आपलेकडील क्र.संकीर्ण २००८/१५३६/प्र.क्र.२५३/ई-६, दि.२२/९/२००८.
२) इकडील पत्र क्रमांक आस्था ३/कें.मा.अ.०५/प्र.क्र.१००७/०८, दिनांक २६/९/२००८.
३) उपसंचालक भूमि अभिलेख,पुणे प्रदेश पुणे यांचेकडील पत्र क्र.मा.अ.अ/पदनिर्देश/ २०१२ दिनांक २/७/२०१२
४)इकडील पत्र क्रमांक आस्था ३/कें.मा.अ.०५/प्र.क्र.६११/२०१२, दिनांक ३/८/२०१२.
५) उपसंचालक भूमि अभिलेख,कोंकण प्रदेश मुंबई यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/ मा.अ.अ०५/२०१४/२३९१, दिनांक १६/६/२०१४

महसूल व वन विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील दिनांक १५/९/२००८ चे परिपत्रकाप्रमाणे भूमि अभिलेख विभागाचे इकडील कार्यालयात व अधिनस्त कार्यालयामध्ये दिनांक २५/९/२००८ रोजी जनमाहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांची नियुक्ती करणेत आलेली होती. तथापि उपसंचालक भूमि अभिलेख, पुणे प्रदेश पुणे या कार्यालयाकडील क्र /माहितीचा अधिकार/ पदनिर्देशित /१२ दिनांक २६/३/२०१२ चे प्रस्तावानुसार या कार्यालयाकडील दिनांक २५/९/२००८ चे प्रस्तावात अंशतः बदल करुन खालील प्रमाणे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून सक्षम अधिकाऱ्यांना पदनिर्देशित करणेत आले आहे.

| अ.क्र | कार्यालय | जनमाहिती अधिकारी / पदसंवर्ग | प्रथम अपीलीय प्राधिकारी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (म.राज्य) पुणे | कार्यालय अधीक्षक,आस्था-३ वर्ग -२ | उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (भूमापन)पुणे ,वर्ग १ | दि. २५/९/२००८ प्रमाणे कायम. |
| २ | प्रादेशिक उपसंचालक भूमि अभिलेख यांची कार्यालये | कार्यालय अधीक्षक ,वर्ग-२ | संबंधित प्रादेशिक उपसंचालक भूमि अभिलेख वर्ग-१ | वरीलप्रमाणे |
| ३ | जिल्हास्तरीय अधीक्षक भूमि अभिलेख यांची कार्यालये | वरिष्ठ लिपीक वर्ग-३,प.स.२ | संबंधित अधीक्षक भूमि अभिलेख, वर्ग -१ | वरीलप्रमाणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | भूमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी , औरंगाबाद | वरिष्ठ लिपीक वर्ग-३,प.स.२ | प्राचार्य, भूमी अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी ,औरंगाबाद, वर्ग -१ | वरीलप्रमाणे |
| ५ | तालुका स्तरीय उप अधीक्षक भूमि अभिलेख, नगर भूमापन अधिकारी व विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख यांची कार्यालये | मुख्यालय सहाय्यक , शिरस्तेदार,प्रमुख लिपीक, वर्ग ३,पस.२ | संबंधित उप अधीक्षक भूमि अभिलेख,नगर भूमापन अधिकारी व विशेष,उपअधीक्षक भूमि अभिलेख वर्ग २ | उपसंचालक भूमि अभिलेख पुणे प्रदेश पुणे यांचेकडील दिनांक २६/३/२०१२ चे प्रस्तावानुसार पदनिदेशामध्ये सुधारणा. |

वरीलप्रमाणे अ.क्र.१ते ४ कायम ठेवून क्र.५ मध्ये नमूद सहाय्यक माहिती अधिकारी, जनमाहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांचे पदनिर्देशित करुन इकडील क्रमांक आस्था ३/कें.मा.अ.०५ / प्र.क्र.६११ / १२,पुणे दिनांक ३/८/२०१२ अन्वये अहवाल सादर करणेत आलेला आहे.

उपसंचालक भूमि अभिलेख,कोंकण प्रदेश मुंबई यांचेकडील क्रमांक आस्था २/कें.मा.अ.०५/ २०१४/२३९१, दिनांक १६/६/२०१४ अन्वये प्रस्ताव प्राप्त झाला असून त्यामध्ये माहिती अधिकारावर दरमहा ५० अर्ज दाखल होत आहेत. माहिती अधिकारावर अपील दाखल झालेनंतर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील क ... १९(१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांनी ४५ दिवसात सुनावणी घेऊन निर्णय देणे कायदेशीर आहे. तसेच उपसंचालक भूमि अभिलेख हे महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत अनुसुचि ई मध्ये नमूद केलेप्रमाणे द्वितीय अपीलीय अधिकारी असून त्याना दरमहा ४० अपीले निकाली करणेचे लक्ष्य देणेत आलेले आहे. त्यामुळे माहिती अधिकार अंतर्गत प्राप्त अपीले व महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत अर्धन्यायिक प्रकरणे कामकाजाचे प्रमाण प्रत्येक सालात दरमहात ८० प्रकरणाचे पुढे आहे.त्यामुळे उपसंचालक भूमि अभिलेख कार्यालयात कार्यरत असणारी जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख संलग्न यांचेकडे कोणत्याही प्रकारचे अपीलाचे कामकाज नाही.त्यामुळे सध्या प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेले उपसंचालक भूमि अभिलेख कोंकण प्रदेश मुंबई यांची नेमणूक रद्द करुन त्याऐवजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(१) प्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून श्रीमती सी.पी.चव्हाण , जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख संलग्न उपसंचालक भूमि अभिलेख कोंकण प्रदेश मुंबई असे घोषित करणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

उपसंचालक भूमि अभिलेख कोंकण प्रदेश मुंबई यांचेकडील प्रस्तावाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे सर्व प्रादेशिक उपसंचालक भूमि अभिलेख या कार्यालयाकडील जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख संलग्न उपसंचालक भूमि अभिलेख यांचे प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून पदनिर्देशित करणेत येत आहे.

| अ.क्र | कार्यालय | जनमाहिती अधिकारी / पदसंवर्ग | प्रथम अपीलीय प्राधिकारी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | प्रादेशिक उपसंचालक भूमि अभिलेख यांची कार्यालये | कार्यालय अधीक्षक ,वर्ग-२ | जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख संलग्न उपसंचालक भूमि अभिलेख वर्ग-१ | उपसंचालक भूमि अभिलेख कोंकण प्रदेश मुंबई यांचेकडील दि. १६/६/२०१४ चे प्रस्तावानुसार पदनिदेशामध्ये सुधारणा |

वरीलप्रमाणे अपीलीय अधिकारी यांचे पदामध्ये अंशतः बदल करुन त्याच कार्यालयातील जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख संलग्न उपसंचालक भूमि अभिलेख यांना प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून पदनिर्देशित करणेत आलेले आहेत.

उपरोक्त नमूद केलेप्रमाणे भूमि अभिलेख विभागातील प्रादेशिक स्तरावरील उपसंचालक भूमि अभिलेख यांचे कार्यालयातील जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांना प्रथम अपीलीय अधिकारी, वर्ग-१ राजपत्रित अधिकाऱ्यांची नेमणूक करणेत आलेली आहे.सबब भूमि अभिलेख विभागाकडून सक्षम अधिकाऱ्यांचीच तालुका/ जिल्हा व विभागीय कार्यालयात प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. तथापि शासनाकडील उपरोक्त परिपत्रकाच्या अनुषंगाने प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अपीलकर्ताच्या अपीलाच्या अनुषंगाने विहीत मुदतीत तसेच आवश्यक कार्यप्रणालीचा वापर करुन व अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने अभ्यास करुन व गुणवत्तायुक्त आदेश निर्गमित करणेबाबतच्या सुचना यापूर्वीच देण्यात आलेल्या आहेत.

(के.एस.शिनगारे)
भा.प्र.से
उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न
जमाबंदी आयुक्त (सर्वसाधारण)पुणे

स्थळ प्रतिवर मा.जमाबंदी आयुक्त,पुणे
यांची स्वाक्षरी असे

प्रत : उपसंचालक भूमि अभिलेख पुणे /मुंबई /नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

२/-वरीलप्रमाणे आपले कार्यालयातील अपीलीय प्राधिकारी यांचे पदनिर्देश करणेत येत आहेत. त्याप्रमाणे माहिती अधिकार अंतर्गत प्राप्त अपील प्रकरणांत जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख संलग्न उपसंचालक भूमि अभिलेख यांनी काम पाहणेचे आहे.

11 AUG 2014
DESPATCHED
No. 22329
22326.